**आकाशवाणी नागपूर,**
**प्रादेशिक वृत्त विभाग**
**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**
**शुक्रवार दिनांक २७ फेब्रुवारी २०२६**

**ठळक बातम्या**

1. **राज्यातल्या खासगी शाळा आणि शिकवणी वर्गातल्या शुल्कावर मर्यादा आणण्यासाठी सरकार लवकरच धोरण जाहीर करणार.**
2. **मराठी भाषा गौरव दिन विविध कार्यक्रमांनी साजरा.**
3. **तंत्रज्ञानाच्या आधारे प्रशासनाचा विस्तार केल्यामुळे देश वेगाने प्रगती करत असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन.**
4. **४थ्या विश्व मराठी साहित्य संमेलनाचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते नाशिक इथं उदघाटन.**

**आता सविस्तर बातम्या .......**

विधिमंडळ

राज्यातल्या खासगी शाळा आणि शिकवणी वर्गातल्या शुल्कावर मर्यादा आणण्यासाठी सरकार लवकरच धोरण जाहीर करणार असल्याची घोषणा शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी आज विधानसभेत केली. राज्यातल्या शाळांची परिस्थिती, शिक्षणाचा अधिकार आणि संबंधित विषयावर सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नांवर ते उत्तर देत होते. येत्या शैक्षणिक वर्षात मराठी शाळांमधली पटसंख्या किमान २५ टक्के वाढेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. राज्य शासन मराठी माध्यमाच्या शाळांकडे विशेष लक्ष देऊन सर्व प्रकारच्या भौतिक सुविधा उपलब्ध करून देत आहे, याखेरीज इतर अनेक उपक्रमही राबविले जात आहेत, अशी माहिती त्यांनी दिली. विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात मराठी शाळांबाबतचा प्रश्न विक्रम पाचपुते यांनी उपस्थित केला होता. ऐकुया आजच्या विधिमंडळ कामकाजाचा आढावा आमच्या प्रतिनिधींकडून -

***शिक्षणाच्या अधिकाराअंतर्गत प्रवेशासाठीची १ किलोमीटरची मर्यादा, शाळा नसतील तिथे शिथिल करण्याचा विचार करू असं आश्वासन शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी दिलं. गेल्या काही वर्षात आधार प्रमाणीकरणामुळे ९ लाख दुबार विद्यार्थी कमी***

*झाल्याची माहिती त्यांनी दिली. विद्यार्थ्यांची लेखन, वाचन आणि गणितातील गती सुधारण्यासाठी निपुण महाराष्ट्र हा उपक्रम सुरू आहे. राज्यातल्या सर्व माध्यमाच्या आणि व्यवस्थापनाच्या शाळांमध्ये मराठी शिकवणं बंधनकारक असून एखाद्या शाळेत याची अंमलबजावणी होत नसली तर सरकार त्यावर कारवाई करेल असं आश्वासन त्यांनी दिलं. विधानपरिषदेचं कामकाज आज दुपारी एक वाजता तारांकित प्रश्नोत्तराच्या तासानं सुरु झालं. राज्यातल्या सहा लाखांहून अधिक पात्र शेतकऱ्यांना २०१७ च्या कृषी कर्ज माफी योजनेअंतर्गत अद्याप लाभाची रक्कम मिळालेली नाही, त्यावर अंमलबजावणी होत असल्याचं सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी सांगितलं. २०२५ च्या खरीप हंगामात अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या पिकांसंदर्भात सहकारी पीक कर्जांचं पुनर्गठन केलं जावं तसंच कर्जफेडीची मुदत १ वर्षानं वाढवून देण्याचे निर्देश दिल्याचं त्यांनी स्पष्ट केलं. राज्यात गेल्या 5 वर्षांत वन्यप्राण्यांच्या हल्ल्यात 420 जणांचा मृत्यू झाला असून त्यापैकी 248 जण वाघाच्या हल्ल्यात, तर 104 जण बिबट्याच्या हल्ल्यात मृत्युमुखी पडल्याची माहिती वनमंत्री गणेश नाईक यांनी आज विधानपरिषदेत प्रश्नोत्तराच्या तासात लेखी उत्तरात दिली. आमदार प्रवीण दरेकर यांनी याबद्दलचा प्रश्न उपस्थित केला होता. 2025 या वर्षात चंद्रपूर जिल्ह्यात वाघांच्या हल्ल्यात 47 जण ठार झाले असून प्रचलित नियमानुसार त्यांच्या वारसांना 827 लाख रुपये वितरित करण्यात आले आहेत, असं त्यांनी सांगितलं. जैव विघटनशील नसलेल्या कृत्रिम फुलांवर राज्यात बंदी आहे. सजावटीसाठी अशा फुलांचा वापर करणारी marriage hall, डेकोरेटर वर कारवाई करू असं आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत लक्षवेधीवरील चर्चेदरम्यान दिलं. (आकाशवाणीसाठी वृत्त विभागातून मी नम्रता फलके)*

मराठी भाषा गौरव दिन

मराठी भाषा गौरव दिन आज साजरा होत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मराठी भाषा गौरव दिनानिमित्त जनतेला शुभेच्छा दिल्या आहेत. मराठी भाषा गौरव दिवसाच्या निमित्ताने विधान भवनातल्या मध्यवर्ती सभागृहात 'जावे विनोदाच्या गावा' या विशेष कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं होतं. भाषणांमधल्या वक्तव्यांचा चुकीचा अर्थ लावला जाऊ नये यासाठी खबरदारी बाळगली जात असल्यानं आता भाषणांमधला विनोदाचा भाग कमी होत चालल्याची खंत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या वेळी व्यक्त केली. वि.स.पागे संसदीय प्रशिक्षण केंद्रातर्फे संपादित 'लोकसेवेचा लोकजागर' या ग्रंथाचं प्रकाशनही मुख्यमंत्र्यांच्या हस्ते यावेळी करण्यात

आलं. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मराठीला रोजगार, अर्थकारण आणि जागतिक ओळखीची भाषा बनवण्याचा शासनाचा निर्धार व्यक्त केला.मराठीच्या संवर्धनासाठी विश्वकोश निर्मिती, साहित्य संमेलने, प्रशासनातील मराठी वापर आणि अनुवादाला चालना देत असल्याच त्यांनी सांगितल. मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळवून देण्यासाठी राज्य शासनाने केलेल्या प्रयत्नांचा त्यांनी आढावा घेतला. नागपूर येथील श्री निकेतन आर्ट्स अँड कॉमर्स कॉलेजमध्ये मराठी भाषा गौरव दिन उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्या डॉ. मेधा कानेटकर होत्या, तर लोकसत्ताचे ज्येष्ठ पत्रकार शफी पठान प्रमुख पाहुणे होते. मराठी भाषेचे जतन, तंत्रज्ञानाचा वापर आणि वाचनसंस्कृती वाढवण्यावर त्यांनी मार्गदर्शन केलं. विद्यार्थ्यांच्या काव्यसादरीकरणाने कार्यक्रमाला विशेष रंगत आली. श्रीमती दादीबाई देशमुख हिंदू मुलींची शाळा इथं देखील मराठी भाषा गौरव दिन उत्साहात साजरा झाला. विद्यार्थ्यांनी नाट्य, कविता आणि कवी परिचयातून मराठी भाषेचं महत्त्व प्रभावीपणे मांडल. कुसुमाग्रज यांच्या *कणा* कवितेने उपस्थितांना मंत्रमुग्ध केलं.

आरोग्य मेळावा

बुलढाणा जिल्हयातील शेगाव इथं आयुष मंत्रालय, भारत सरकार आणि अखिल भारतीय आयुर्वेद महासंमेलनाच्या वतीने राष्ट्रीय आरोग्य मेळावा आयोजित करण्यात आला. या मेळाव्याला उत्तम प्रतिसाद मिळत असून वैविध्य पूर्ण उपक्रम घेतल्याची माहिती केंद्रीय आयुष मंत्री प्रतापराव जाधव यांनी दिली.

उद्या या मेळाव्याचा शेवटचा दिवस असून, या आरोग्य मेळाव्याचा लाभ घ्यावा असे आवाहन  जाधव यांनी केलं आहे.

शक्तीपीठ महामार्ग

शक्तीपीठ महामार्गाबाबत येत्या पाच मार्च रोजी बाधीत शेतकऱ्यांबरोबर चर्चा केली जाईल, असं आश्वासन राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिलं आहे. या

महामार्गाबाबत परभणी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बाधित शेतकऱ्यांनी बेमुदत उपोषण सुरु केलं होतं. यावेळी मराठा आरक्षण आंदोलनकर्ते मनोज जरांगे यांनी भेट दिली.

ऑनलाईन परिसंवाद

व्यवसायात सुलभता आणून केंद्र सरकार तंत्रज्ञानाच्या आधारे प्रशासनाचा विस्तार करत असून त्यामुळेच देश वेगाने प्रगती करत असल्याचं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं. विकसित भारतासाठी तंत्रज्ञान, सुधारणा आणि निधीची तरतूद या विषयावर आयोजित अर्थसंकल्पोत्तर वेबिनारला ते आज दूरदृश्य प्रणालीद्वारे संबोधित करत होते. देशातल्या विविध उद्योगांनी नवोन्मेषाच्या संकल्पनामधे गुंतवणुकीसाठी पुढे यावं, असं आवाहन पंतप्रधानांनी आपल्या संबोधनात केलं. अर्थसंकल्पाचं मूल्यमापन अनेकदा वेगवेगळ्या निकषांवर केलं जातं, पण, राष्ट्रीय अर्थसंकल्प हा अल्पकालीन अंदाजपत्रक नसून तो विकासाचा धोरणात्मक आराखडा आहे, असं मोदी यावेळी म्हणाले.

महामार्ग, रेल्वे, बंदरे, डिजिटल नेटवर्क, उर्जा प्रणाली यांसारख्या ठोस माध्यमांची निर्मिती हा भारताच्या विकासाचा पाया ठरेल, असं मोदी यावेळी म्हणाले.

विश्व मराठी साहित्य संमेलन

मराठी माणूस त्याच्या पराक्रमाने आणि अभ्यासाने आपली एक वेगळी प्रतिमा तयार करत आला आहे. आज प्रदान करण्यात आलेले पुरस्कार अशा साहित्यिकांना देण्यात आले ज्यामुळे राज्य सरकारच्या पुरस्काराचं महत्त्व आणि महात्म्य दोन्हीही वाढलं, असे गौरवोद्गार मुख्यमंत्री देवेन्द्र फडणवीस यांनी काढले. चौथ्या विश्व मराठी साहित्य संमेलनाचं उदघाटन आज नाशिक इथं मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांच्या हस्ते झालं, त्यावेळी ते बोलत होते. तत्पूर्वी मुख्यमंत्र्यांच्या हस्ते राज्य शासनातर्फे देण्यात येणारे साहित्य पुरस्कार प्रदान करण्यात आले. याच कार्यक्रमात ज्येष्ठ साहित्यिक भालचंद्र नेमाडे यांना साहित्य भूषण पुरस्काराने गौरविण्यात आलं. यावर्षीपासून विश्व मराठी संमेलन विशेष पुरस्कार सुरू करण्यात आला असून तो आळंदी येथील शांतीब्रहम गुरुवर्य मारुती बाबा कुरेकर यांना मुख्यमंत्र्यांच्या हस्ते प्रदान करण्यात

आला. तत्पूर्वी विश्व मराठी संमेलनाच्या पार्श्वभूमीवर आज कुसुमाग्रजांच्या निवासस्थानापासून ग्रंथदिंडीला उत्साहात प्रारंभ करण्यात आला.

संजय देशमुख अपघात

यवतमाळ-वाशिम लोकसभेचे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे खासदार संजय देशमुख यांच्या वाहनाला टिप्परने मागून धडक दिल्यामुळं झालेल्या अपघातात किरकोळ जखमी झाले आहेत. दिग्रस मार्गावरील साखरा गावाजवळ रेल्वे कामावरील टिप्परने त्यांच्या वाहनाला पाठीमागून जोरदार धडक दिली. अपघातात खासदारांच्या वाहनाचे नुकसान झाले आहे.

*****